MHSO020037072022

दाखल दिनांक : २८/०९/२०२२
नोंदणी दिनांक : ०४/१०/२०२२
निकाल दिनांक : २९/११/२०२५
कालावधी : ३ व., १ म., २५ दि.

**सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, सोलापूर यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी : ओमशंकर शि. पाटील)**

**विशेष दिवाणी दावा क्र. ४२२/२०२२**

**निशाणी क्र. ३८/अ**

| | |
|---|---|
| **सुभाष ट्रेडिंग कंपनी दुकानचे मालक**<br>**संदीप सुभाषचंद्र मेहता,**<br>वय– ५३ वर्षे, धंदा– व्यापार,<br>रा. ऑफिस नं.४, वेलनेस झोन,<br>पहिला मजला, सात रस्ता,<br>सोलापूर तर्फे कुलमुखत्यार<br>**हरिदास नागनाथ कस्तुरे,**<br>वय– ५९ वर्षे, धंदा– नोकरी,<br>रा. ऑफिस नं.४, वेलनेस झोन,<br>पहिला मजला, सात रस्ता, सोलापूर. | **वादी** |

**– विरुध्द –**

| | |
|---|---|
| **सहयाद्री बियर शॉपी, पंढरपूर,**<br>**प्रोप्रा. उत्तमराव सुभाष अभंगराव,**<br>वय– ४८ वर्षे, धंदा– व्यापार,<br>रा. विदेशी दारु दुकान,<br>एस.टी. स्टॅन्डच्या पाठीमागे,<br>मु.पो. पंढरपूर, जिल्हा सोलापूर. | **प्रतिवादी** |

**व**

**उत्तमराव सुभाष अभंगराव,**
वय– ४८ वर्षे, धंदा– व्यापार,
रा. मनिषा नगर, विठ्ठल मंदिर मागे,
मु.पो. पंढरपूर, जिल्हा सोलापूर.	} **प्रतिवादी**

-----------------------------------------

**दावा – रक्कम वसुलीकरिता.**

-----------------------------------------

-----------------------------------------

वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. यु. के. केकडे
प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फा

-----------------------------------------

## न्यायनिर्णय
## (दिनांक २९/११/२०२५)

सदर दावा खातेबाकी येणे रक्कम वसुल होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे.

**वादीचे थोडक्यात म्हणणे असे की,**

२) वादीचा सुभाष ट्रेडींग कंपनी या नावाने दाव्यात नमूद पत्त्यावर विदेशी दारु माल खरेदी विक्रीचा ठोक व्यापार आहे. वादी सुभाष ट्रेडींग कंपनीचे संदीप सुभाषचंद्र मेहता हे मालक असून त्यानी त्यांचे फर्ममधील अकाऊटंट हरिदास नागनाथ कस्तुरे हे सदर दुकानाचा संपूर्ण व्यवहार पाहात असल्याने व प्रतिवादी बरोबर झालेल्या व्यवहाराची माहिती असल्याने त्यांना कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे. त्या अधिकारात हरिदास कस्तुरे यांनी प्रस्तुतचा दावा दाखल

केलेला आहे. वादीचे होलसेल विदेशी दारु खरेदी–विक्रीचे लायसन्स आहे.

३) प्रतिवादीचा सहयाद्री बियर शॉपी या नावाने पंढरपूर येथे विदेशी दारुचा व्यवसाय आहे. प्रतिवादीने त्याचे व्यवसायाकरीता वादीचे दुकानातून वेळोवेळी उधारीने दारुमाल खरेदी केलेला आहे. त्याबाबत वादीने त्यांचे दुकानी प्रतिवादीचे नावाने खाते ठेवलेले असून प्रतिवादीने नेलेल्या मालाची रक्कम खात्यात नावे टाकलेली असून प्रतिवादीने दिलेला वसूल प्रतिवादीच्या खात्यात वेळोवेळी जमा केलेला आहे. प्रतिवादीने खरेदी केलेला माल मा. एक्साईज सुप्रिटेंडेट यांचेमार्फत प्रतिवादीस पोहोच केला आहे. वादीने प्रतिवादीस त्याचे मागणीनुसार एक्साईजच्या नियमानुसार ट्रान्सपोर्ट परमिटने दारु माल खरेदी दिला आहे.

४) सदर माल प्रतिवादीस मिळाला असून उधारीने घेतलेल्या मालाची रक्कम प्रतिवादीने वादीस २१ दिवसाचे आत देण्याची होती. मालाची रक्कम प्रतिवादीने वादीस २१ दिवसाचे आत न दिल्यास द.सा.द.शे. १२% प्रमाणे व्याज देण्याचे कबूल केलेले आहे. मूळ बिल वादी दोन प्रतित करतो, पैकी मूळ बिल प्रतिवादीस देतो व त्याची दुसरी प्रत वादीकडे ठेवली जाते. तसेच ट्रान्सपोर्ट पासच्या वादी चार प्रति करतो. एक मूळ वादीकडे, त्याची दुसरी प्रत माल पुरवला त्या भागातील एक्साईज डिव्हिजनकडे, तिसरी प्रत प्रतिवादीकडे व चौथी प्रत एक्साईज कमिशन आवश्यकतेनुसार पडताळणीसाठी वादीकडे असते.

५) प्रतिवादीने वादीकडून वेळोवेळी उधारीने माल खरेदी केलेला आहे. वादीने नियमित ठेवलेल्या प्रतिवादीच्या खात्याचा उतारा सोबत दाखल केलेला

आहे. प्रतिवादीच्या खात्याचा जमा व नावे कलमांचा हिशोब पाहता प्रतिवादीकडे सदर बिलाची मुद्दल रक्कम रुपये १४,०७,०५२/- व त्यावरील दिनांक २७/०८/२०१९ ते २५/०९/२०२२ पावेतो द.सा.द.शे. १२% प्रमाणे होणारे व्याज रुपये ५,२०,१२१/- आणि नोटीस फी रु. ४००/- असे एकूण रक्कम रुपये १९,२७,५७३/- येणे बाकी आहे. सदर कामी पूर्वी मुदतीत म्हणजे माल घेतल्यापासून २१ दिवसात रक्कम न दिल्यास द.सा.द.शे. २४% प्रमाणे व्याज आकारले जात होते. परंतु, सध्या प्रचलित दराप्रमाणे म्हणजे द.सा.द.शे. १२% प्रमाणे व्याज आकारले जात आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात द.सा.द.शे. १२% प्रमाणे व्याजाची आकारणी केली आहे.

६) प्रतिवादीस सदरची रक्कम वादीने अनेक वेळा मागणी केली, परंतु प्रतिवादीने रक्कम देण्याची टाळाटाळ केली. प्रतिवादीने वादीस खातेबाकी मान्य करून दिनांक ३०/०९/२०१९ रोजी रुपये २,००,०००/- जमा केले परंतु त्यानंतर काहीही रक्कम दिली नाही. सदर कामी प्रतिवादीने येणे बाकीची रक्कम न दिल्याने वादीने प्रतिवादीस दि. ०२/०९/२०२२ रोजी वकिलामार्फत रजिस्टर पोस्टाने दुकानचे व घरचे पत्त्यावर नोटीस पाठवली व त्यामध्ये देय बाकी रक्कम आणून देण्याबाबत कळविले. सदरची दुकानच्या पत्त्यावर पाठविलेली नोटीस डोअर लॉक्ड असा शेरा मारुन दि. ०५/०९/२०२२ रोजी परत आलेली आहे. तसेच सदरची घरच्या पत्त्यावर पाठविलेली नोटीस प्रतिवादीने घेण्यास नकार दिल्याने 'Refused' असा शेरा मारुन दि. ०३/०९/२०२२ रोजी परत आलेली आहे. अशाप्रकारे प्रतिवादीस नोटीसीची माहीती व जाणीव होऊनही

प्रतिवादीने नोटीसी प्रमाणे वादीची रक्कम दिलेली नाही. त्यामुळे वादीस सदरची रक्कम वसूल होऊन मिळणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडत आहे.

७) प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स प्राप्त होऊनही ते या दाव्याकामी गैरहजर राहिले. त्यामुळे सदर दावा प्रतिवादी विरुध्द एकतर्फा पुढे चालविण्यात आला.

८) विचारासाठीचे मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष मी त्यांच्यासमक्ष नोंदविले असून त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादपत्रात नमुद केल्याप्रमाणे वादीने प्रतिवादीला माल पुरवठा केलेला आहे काय? | होय. |
| २. | वादी प्रतिवादी कडून रक्कम वसुल होवुन मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| ३. | वादी सदर रक्कमेवर त्याने मागणी केल्याप्रमाणे व्याजदर मिळण्यास पात्र आहे काय? नसल्यास किती टक्के दराने? | नाही. द.सा.द.शे. ८ टक्के दराने. |
| ४. | आदेश आणि हुकुमनामा काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## – कारणमिमांसा –

९) वादीने त्यांचे कथन सिध्द करण्यासाठी खाली नमुद पुरावा सादर

केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | वादीतर्फे कुलमुखत्यार हरिदास नागनाथ कस्तुरे यांचे सरतपासाचे शपथपत्र. | नि.क्र.१० |
| २. | वादी फर्मचे लायसेन्सची प्रमाणित प्रत | नि.क्र.११ |
| ३. | कुलमुखत्यारपत्राची प्रमाणित प्रत | नि.क्र.१२ |
| ४. | प्रतिवादीचा खाते उतारा प्रमाणपत्रासह | नि.क्र.१३ |
| ५. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.१८०७ व १८०८ च्या प्रमाणित प्रती | नि.क्र.१४, १५ |
| ६. | ट्रान्सपोर्ट चलन नं.५०३७ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.१६ |
| ७. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.१८६३ व १८६५ च्या प्रमाणित प्रत | नि.क्र.१७, १८ |
| ८. | ट्रान्सपोर्ट चलन नं.५१७८ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.१९ |
| ९. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.२३३७ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२० |
| १०. | ट्रान्सपोर्ट चलन नं.५५४३ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२१ |
| ११. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.२३२५ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२२ |
| १२. | ट्रान्सपोर्ट चलन नं.२०५६ ची प्रमाणित प्रती | नि.क्र.२३ |
| १३. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस | नि.क्र.२४ |

| | | |
|---|---|---|
| | नं.२८९० ची प्रमाणित प्रत | |
| १४. | ट्रान्सपोर्ट चलन नं.२६१८ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२५ |
| १५. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.३९०२ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२६ |
| १६. | ट्रान्सपोर्ट चलन नं.३६४६ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.२७ |
| १७. | वादीने प्रतिवादीस दिलेले मालाचे बिल इनव्हाईस नं.४३४७, ४३५८ व ४३८३ च्या प्रमाणित प्रती | नि.क्र.२८ ते ३० |
| १८. | ट्रान्सपोर्ट चलन नं.४०४८ ची प्रमाणित प्रत | नि.क्र.३१ |
| १९. | प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत | नि.क्र.३२ |
| २०. | रजिस्टर केलेल्या पोस्टाच्या दोन पावत्या | नि.क्र.३३, ३४ |
| २१. | प्रतिवादीचे नोटीस परत आलेले दोन बंद पाकीट | नि.क्र.३५, ३६ |
| २२. | वादीतर्फे पुरावा बंद पुरसीस | नि.क्र.३७ |

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीता</u>–**

१०) वादीतर्फे सा.क्र.१ हरिदास नागनाथ कस्तुरे यांनी वादपत्र मधील संपुर्ण मजकुर त्यांच्या सरतपासात कथन केलेला आहे. वादीने दाखल केलेली कागदपत्रे असे दर्शवतात कि, वादीला निशाणी क्रमांक ११ वरील परवाना देण्यात आलेला आहे. तसेच हा दावा चालवण्यासाठी साक्षीदाराला निशाणी क्रमांक १२ वरील कुलमुख्त्यार करून देण्यात आलेले आहे. निशाणी क्रमांक १४ ते ३१ वरील बिल इनव्हाईस आणि ट्रान्सपोर्ट चलन यावरून वादीने प्रतिवादीला वेळोवेळी माल पुरवठा केल्याचे निदर्शनास येते. निशाणी क्रमांक १३ वरील

खातेउता–यावरून असे निदर्शनास येते कि, प्रतिवादी वादीचे रक्कम रूपये १४,०७,०५२/– रूपये देणे लागत होता. वादीचे असे म्हणणे आहे कि, दिनांक ३०/०९/२०१९ रोजी रुपये २,००,०००/– जमा केले. त्याची नोंद निशाणी क्रमांक १३ वरील खातेउता–यात आहे. तसेच कोरोना काळ हा मुदतीची गोळाबेरीज करताना वगळणे आवश्यक आहे. त्यामुळे हा दावा मुदतीत आहे.

११) प्रतिवादीला समन्सची बजावणी होवुन देखील तो गैरहजर राहिला आहे. त्यामुळे प्रस्तुत दावा हा प्रतिवादीविरूध्द एकतर्फा आहे. त्यामुळे प्रतिवादीविरूध्द प्रतिकुल अनुमान काढणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेला तोंडी आणि कागदोपत्री पुरावा हा अखंडीत राहिलेला आहे. या पुराव्यावर अविश्वास ठेवावा असे काहीही संचिकेवर नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादीला माल पुरवठा केल्याचे आणि प्रतिवादी वादीचे रक्कम रूपये १४,०७,०५२/– रूपये देणे लागत असल्याचे वादीने सिध्द केले आहे.

१२) वादीने सदर रक्कमेवर १२ टक्के व्याजदर मागणी केलेला आहे. परंतु, दिवाणी व्यवहार संहितेच्या कलम ३४ अन्वये एवढा मोठा व्याजदर मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. प्रस्तुत व्यवहार हा व्यापारी स्वरूपाचा असल्याने वादी हा सदर रक्कमेवर द.सा.द.शे. ८% व्याजदर मिळण्यास पात्र आहे. प्रतिवादीने वादीला हा दावा दाखल करण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादीला या दाव्याचा संपुर्ण खर्च दयावा असे आदेशीत करणे मला न्यायोचित वाटते. त्यामुळे हा दावा अंशतः मंजूर करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे मुद्दे क्रमांक १, २ यांचे उत्तर मी होकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर मी त्याप्रमाणे देत आहे

आणि मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तराच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## – <u>आदेश</u> –

१. दावा अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. दिनांक २७/०८/२०१९ पासून ते संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे. ८% व्याजदराने प्रतिवादीने वादीला रक्कम रुपये १४,०७,०५२/– द्यावी, असे आदेशीत करण्यात येते.

३. प्रतिवादीने वादीला या दाव्याचा संपूर्ण खर्च द्यावा.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Digitally signed by PATIL OMSHANKAR SHIVRAJ
Date: 2025.11.29 17:39:24 +0530

दिनांक– २९/११/२०२५

(**ओमशंकर शि. पाटील**)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | R.P. Sakinal, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Civil Judge, Sr. Div., Solapur. |
| c) | Date of Judgment/Order | : | 29.11.2025 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 29.11.2025 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 29.11.2025 |